| MHPU120004122024 | नियमित दिवाणी दावा क्र.९०/२०२४ मधील<br>निशाणी क्रमांक ४१ वरील आदेश<br>( अभिषेक नंदकुमार भिडे विरुध्द सदाशिव उर्फ मिलींद रामेश्वर भिडे व इतर ) |
| --- | --- |

प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दाव्यास कैफियत देण्याकरीता झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे सदरचा दावा वादी यांनी ठराव, मनाई व खरेदीखत रद्द करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दाव्याची दाव्यासंदर्भात आवश्यक असलेली कागदपत्रे व माहिती वेळेत न मिळाल्यामुळे कैफियत दाखल करण्यास ९ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा दावा गुणदोषावर निकाल होण्यासाठी विलंब माफ होणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी विलंब माफ करण्याची विनंती केलेली आहे.

०३. वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केलेला आहे. वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांनी कोणत्या कारणाने विलंब झाला याचे कारण नमूद केलेले नाही. प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक लेखी म्हणणे देण्यास विलंब केलेला आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे. याउलट, अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रतिवादी क्र.२ यांना १५,०००/– रु दंड करण्याची विनंती केलेली आहे.

०४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.२ यांनी विहित मुदतीत दाव्यास त्यांची कैफियत दाखल केली नसल्याची बाब सकृतदर्शनी दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहितामधील तरतूदीनुसार प्रतिवादी यांनी ३० दिवसात त्यांची कैफियत दाखल करणे अनिवार्य आहे. परंतु त्यानंतर न्यायालयाने मुदत वाढविल्यास पुढील ६० दिवसापर्यंत म्हणजेच एकूण ९० दिवसात प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणे अपेक्षित आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणात विहित मुदतीत प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. वादी यांनी सदरचा दावा

प्रतिवादी यांचेविरुध्द ठराव, वाटप व निरंतर मनाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. सदर दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता प्रतिवादी यांची कैफियत आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. प्रतिवादी क्र.२ यांना दाव्यास कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2026.02.24 15:57:16 +0530

**ठिकाण – भोर** **( एस.डी.शिरसाट )**
**दिनांक – २४.०२.२०२६.** **०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भोर .**